नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **१३२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **नुतन काशिनाथ घरत** |
| वय सुमारे | : | ५५ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | मु. सातराठी, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील कुमारी कविता परीट यांचेमार्फत** :

दि. ०४/०३/२०१० रोजी मी घरी होते. रात्री अंदाजे ०८.३० वाजता सुजित नावाचा मुलगा माझ्या घरी आला व त्याने सांगितले की, 'तुमच्या मुलाला सुनिल पेडणेकर व प्रविण पेडणेकर साने गुरुजी उद्यानाशेजारी, ओमकार मेडीकलसमोर मारहाण करत आहेत,' माझ्या मुलाचे नाव मयुर घरत आहे.

०२. त्यानंतर मी व माझे पती काशिनाथ घरत लगेच धावत घटनास्थळी गेलो. सुनिल पेडणेकर व प्रविण पेडणेकर माझ्या मुलाला मारहाण करीत होते. मी सोडवण्याचा प्रयत्ना केला. तेथे गणेश पाटील धावत आला व त्याने माझ्या मुलाला लाथेने खाली पाडले. माझे पती सोडवण्यासाठी गेले असता प्रविण पेडणेकरने त्यांच्या तोंडावर फाइट मारली. तेथे असलेल्या महेश बालदी याने मला शिवीगाळ केली. त्यांनी मला, 'रांड, रखेल, पोराला सांभाळता येत नाही, मादरचोद, तुला बघून घेईन,' अशी शिवीगाळ करुन धमकी दिली.

०३. सुनिल पेडणेकरने बांबूच्या काठीने माझ्या मुलाच्या पायावर व डोक्यावर मारहाण केली. मी सोडविण्यासाठी गेले असता सुनिल पेडणेकरने त्यांच्या जवळची पिस्तुल काढून मला ठार मारण्याची धमकी दिली. माझ्या पतीने सोडवण्याचा प्रयत्न

केला. त्यानंतर आम्ही मयुरला इंदिरा गांधी रुग्णालय, उरण येथे घेवून गेलो. त्यानंतर आम्हाला पोलीसांनी पोलीस ठाण्यात नेले. ज्या आरोपींनी मारहाण केली मी त्यांना ओळखते. ते न्यायालयात हजर आहेत. आरोपींपैकी दोन आरोपी न्यायालयात हजर आहेत. ज्या बांबूच्या काठीने मारहाण केली ती दाखविल्यास मी ओळखू शकेन. (साक्षीदाराने आर्टीकल 'अ' कडील बांबूची काठी बघितली.) ती तिच आहे. पिस्तुल दाखविल्यास मी ओळखू शकेन.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०४. पोलीस ठाण्यात तक्रार कोणी दिली होती हे मला आठवत नाही. सदर केस होण्यापूर्वी माझ्याविरुद्ध पेडणेकरांच्या तक्रारीवरुन केस झाली होती. माझ्या मुलाविरुद्ध सदर घटनेपूर्वी माझ्या मुलाने मुलीला फोन केल्यासंदर्भात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली होती. पोलीसांनी माझा जुलै महिन्यात जबाब घेतला होता. ज्यावेळी माझा जबाब घेतला त्यावेळी माझा मुलगा रुग्णालयात भरती नव्हता.

०५. माझ्या घरापासून संदीप जाधवचे औषधांचे दुकान पायी चालत गेल्यास पाच मिनिटांच्या अंतरावर आहे. माझे औषध सुद्धा आम्ही त्याच दुकानातून घेत होतो. संदीप जाधवसोबत माझ्या मुलाचे चांगले संबंध आहेत. माझ्या मुलाविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली होती त्यावेळी मला पोलीस ठाण्यात जावे लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाल्यामुळे मी पेडणेकरांवर चिडले होते.

०६. माझे शिक्षण दहाव्या वर्गापर्यंत झालेले आहे. मला मराठी वाचता येते. पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते की, मी जेव्हा घटनास्थळी पोहोचले तेव्हा सुनिल पेडणेकर मुलाला मारहाण करीत होता. सदर बाब माझ्या जबाबात लिहीलेली नाही. ती का लिहीली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी सोडवायचा प्रयत्न

केला त्यावेळी गणेशने माझ्या मुलाला खाली पाडले ही बाब जबाब देतेवेळी पोलीसांना सांगितली होती. यातील 'मी सोडवायला गेले तेव्हा,' हे माझ्या जबाबात लिहीलेले नाही. ते का लिहीलेले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०७. पोलीसांना जबाब देतेवेळी, सुनिल पेडणेकरने मला पिस्तुलने ठार मारण्याची धमकी दिली होती, हे सांगितले नव्हते. बांबूच्या काठीचे वर्णन मी पोलीसांना सांगितले नव्हते. तथाकथीत घटना घडल्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेले होते व मला अटक करण्यात आली होती. मला अटक होत आहे हे समजल्यानंतर माझ्या पतीने तक्रार दिली, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी माझे महेश बालदीसोबत बोलणे झाले नाही.

०८. तेथे अंदाजे ५०—१०० लोक जमले होते. घटना औषधी दुकानाच्या काउंटरजवळच घडली. मला माहिती मिळाल्यानंतर मी पाच मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. मी पोहोचण्यापूर्वी तेथे लोकांची गर्दी जमली होती. तेथे आजूबाजूला बरीच दुकाने आहेत व बाजूला एक दवाखाना आहे. तो दवाखाना सिप्पी डॉक्टरांचा आहे. घटनास्थळापासून इंदिरा गांधी रुग्णालयात रिक्षेने जायला १० मिनिटे लागतात. त्या दिवशी डॉ. सिप्पी दवाखान्यातून लवकर गेले होते. इंदिरा गांधी रुग्णालयात उपचार घेतल्याचे कोणतेही कागद दिले नव्हते.

०९. एम्.जी.एम्. रुग्णालयात माझा मुलगा कसा गेला, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा तेथे चाकू घेवून आला होता व लोक जमा झाल्याने तो पळून जात होता त्यावेळी खाली पडल्याने त्याला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतीने पेडणेकरांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला आरोपींनी बांबूच्या काठीने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, महेश बालदीने मला 'रांड, रखेल, पोराला सांभाळता येत

नाही, मादरचोद, तुला बघून घेईन,’ अशी शिवीगाळ केली, हे मी खोटे सांगत आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, सुजित नावाचा माझ्या मुलाचा कोणीही मित्र नाही. माझ्या मुलाने मला माहिती दिली की, सुजित नावाचा त्याचा कोणीही मित्र नाही, असे घडले नाही. पोलीसांना जबाब देतेवेळी, मला मुलाकडून समजले की, सदर भांडणाबद्दल माहिती देणारा सुजित नावाचा कोणीही त्याचा मित्र नाही, हे सांगितले नव्हते. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग ‘अ’ मधील मजकूर मी पोलीसांना सांगितला नव्हता. त्यांनी तो का लिहीला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने संगनमत करुन आरोपींविरुद्ध खोटी तक्रार दाखल केली आहे व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगितलेली संपूर्ण घटना खोटी सांगितलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ‘अ’ कडील बांबूच्या काठीने मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — समक्ष

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **२०/०३/२०२३**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **१३३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संदीप नामदेव जाधव** |
| वय सुमारे | : | ४८ वर्षे, व्यवसाय : मेडीकल दुकान |
| निवासस्थान | : | मु. उरण, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील कुमारी कविता परीट यांचेमार्फत</u>**

:

दि. ०४/०३/२०१० रोजी सायंकाळी मी माझे दुकान ओमकार मेडीकलमध्ये होतो. त्या दिवशी सायंकाळी माझ्याकडे मयुर आला होता. त्याने माझ्याकडून ओआरएस् एनर्जी ड्रिंक मागितले होते. मी त्याला सदर ड्रिंक दिले. तो तेथेच एनर्जी ड्रिंक पित होता. तेवढ्यात पाठीमागून कोणीतरी त्याच्यावर बांबूच्या काठीने हल्ला केला. त्यानंतर तो मागे वळला व, 'का मारता?' असे त्यांना म्हणू लागला. त्या लोकांनी शिवीगाळ करुन पुन्हा डोक्यावर फटके मारायला सुरुवात केली होती. कोण मारहाण करत होते, हे मला तोपर्यंत माहीत नव्हते.

०२. मयुरला काठीने खूप फटके मारल्याने तो रक्तबंबाळ झाला होता व माझ्याच काउंटरजवळ खाली पडला. कोणीतरी त्याच्या घरी कळविले. त्यानंतर त्याचे आईवडील तेथे आले होते. दरम्यान तेथे खूप गर्दी जमली होती. तेथे महेश बालदी आले होते. मी त्यांना ओळखत होतो व आहे. मयुरच्या आईने तेथे मारहाण करणा—यांना व महेश बालदींना माझ्या मुलाला का मारता? असे विचारले. त्यावेळी महेश बालदीने मयुरच्या आईवडीलांना शिवीगाळ केली. मयुरच्या वडीलांच्या तोंडावर कोणीतरी ठोसा मारला.

०३. ज्यांनी मारहाणीला पहिल्यांदा सुरुवात केली त्यांनी कोणाला तरी फोन लावला व फोनवर ते म्हणाले की, 'साहेब, मी त्याला मारले आहे.' फोनवर असलेल्या माणसाने तुम्ही कोण बोलता? असे विचारले त्यावेळी मारहाण करणा–याने, 'मी सुनिल पेडणेकर बोलतो', असे म्हटले होते. त्यावेळी मला कळाले की, सुनिल पेडणेकर मयुर घरतला मारहाण करत आहे. इतर लोकांची नावे मला कळाली नाहीत. घटनेनंतर मला कळाले की, प्रविण पेडणेकर सुद्धा मारहाणीत होते. ज्या बांबूच्या काठीने मारहाण केली ती आज दाखविल्यास ओळखणे कठीण आहे. (आर्टीकल 'अ' कडील बांबूची काठी साक्षीदाराने बघितली.) सदर काठी तिच आहे हे मी सांगू शकत नाही.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०४. उरणमध्ये 'पेडणेकर' नावाचे सोन्याचे व्यापारी आहेत. घटनेपर्यंत मी सुनिल पेडणेकर व प्रविण पेडणेकरांना ओळखत नव्हतो. मयुर घरत माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. पोलीसांनी मला घटनेच्या २–४ दिवसांनी जबाब द्यायला बोलावले होते. त्यावेळी मयुर घरतविरुद्ध सुद्धा पोलीस केस झाली होती, हे मला माहीत नाही. मयुर घरत माझ्या दुकानातून चाकू किंवा कैचीसारखी धारदार वस्तू घेवून गेला होता किंवा कसे? हे मला पोलीसांनी विचारले होते. माझ्या दुकानाला एक पायरी आहे. घटना माझ्या दुकानातील काउंटरजवळ असलेल्या ओट्यावर घडली.

०५. त्या दिवशी माझ्या शेजारी दवाखाना असलेले डॉक्टर होते कि नाही, हे मला आठवत नाही. या घटनेमध्ये माझ्या काउंटरचे किंवा दुकानाचे नुकसान झाले नव्हते. दि. ०४/०३/२०१० रोजी मी पोलीस ठाण्यात गेलो

नव्हतो. पोलीसांनी माझा जबाब दि. १६/०३/२०१० रोजी घेतला. मी स्वत:हून घटनेच्या दिवशी किंवा त्यानंतर माहिती द्यायला पोलीसांकडे गेलो नव्हतो. दि. १६/०३/२०१० रोजी मयुर गावामध्ये होता कि नाही, हे मला माहीत नाही. ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी मी मयुरला बघायला इंदिरा गांधी रुग्णालयात गेलो होतो.

०६. पोलीसांना जबाब देतेवेळी, तेथे महेश बालदी आले होते, मी त्यांना ओळखत होतो व आहे, मयुरच्या आईने तेथे मारहाण करणा—यांना व महेश बालदींना माझ्या मुलाला का मारता? असे विचारले, त्यावेळी महेश बालदीने मयुरच्या आईवडीलांना शिवीगाळ केली, हे सांगितले नव्हते. मयुरच्या वडीलांना तोंडावर कोणीतरी ठोसा मारला, हे पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले नव्हते. पोलीसांना जबाब देतेवेळी, ज्यांनी मारहाणीला पहिल्यांदा सुरुवात केली त्यांनी कोणाला तरी फोन लावला व फोनवर ते म्हणाले की, 'साहेब, मी त्याला मारले आहे,' फोनवर असलेल्या माणसाने तुम्ही कोण बोलता? असे विचारले त्यावेळी मारहाण करणा—याने, 'मी सुनिल पेडणेकर बोलतो', असे म्हटले होते, त्यावेळी मला कळाले की, सुनिल पेडणेकर मयुर घरतला मारहाण करत आहे, हे सांगितले नव्हते.

०७. मयुरला काठीने खूप फटके मारल्याने तो रक्तबंबाळ झाला होता, हे जबाब देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. मयुरला फटक्यांचा वर्षाव केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मयुर माझा मित्र असल्याने त्याच्या बाजूने मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे महेश बालदी आले होते, मी त्यांना ओळखत होतो व आहे, मयुरच्या आईने तेथे मारहाण करणा—यांना व महेश

बालदींना माझ्या मुलाला का मारता? असे विचारले, त्यावेळी महेश बालदीने मयुरच्या आईवडीलांना शिवीगाळ केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयुरला सुनिल व प्रविण पेडणेकर यांनी मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयुरला काठीने मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — समक्ष

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.
दिनांक : **२०/०३/२०२३**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **१६७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **अस्लम मुनीर राखे** |
| वय सुमारे | : | ५७ वर्षे, व्यवसाय : रिक्षाचालक |
| निवासस्थान | : | उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u> :**

दि. ०५/०३/२०१० रोजी मला उरण पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीसांनी माझी कागदावर सही घेतली. कागद कशाचा होता हे मला माहीत नाही. कागदावर अनु.क्र. ०२ कडे माझी सही असून त्यातील मजकूर मला माहीत नाही. सही **निशाणी क्र. १६८** कडे आहे. त्या दिवशी २—३ सह्या केल्या होत्या. निवेदन पंचनाम्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सह्या **निशाणी क्र. १६९** व **१७०** कडे आहेत.

**(साक्षीदार त्याच्या पूर्वीच्या बयाणावर कायम नसल्याने अभियोग पक्षाने त्याला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/०३/२०१० रोजी पोलीस ठाणे उरण येथील पोलीस उपनिरीक्षक शेळकर यांनी ओमकार मेडीकल, नागाव रस्ता, उरण येथे पंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीस व दुसरा पंच समद मुल्ला हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ फिर्यादीने दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ एन्.

आय्. हायस्कूलकडून एन्.एम्.एम्.टी. बस स्टॉपकडे जाणारा नागाव रस्ता, ओमकार मेडीकल समोर, उरण असे होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा सकाळी ७.३० वाजता सुरु करुन ८.३० वाजता पूर्ण केला.

०३. हे म्हणणे खरे नाही की, त्याच दिवशी पोलीसांच्या रखवालीत असलेला आरोपी सुनिल जनार्दन पेडणेकर याने माझ्या समक्ष गुन्ह्यात वापरलेल्या हत्याराविषयी कबुली दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याने माझ्या समक्ष निवेदन दिले होते की, मयुर यास मारण्यास वापरलेली बांबूची काठी व धमकी दिलेले रिव्हॉल्वर त्याच्या घरात लपवून ठेवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुपारी १२.३५ वाजता पंचनामा सुरु होवून १२.४५ वाजता संपला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनाम्यावर मी, दुसरा पंच व पोलीसांनी सह्या केल्या.

०४. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी, आरोपी, पोलीस व दुसरा पंच खाजगी वाहनाने उरण, वाणी आळी मार्गे आरोपी यांचे कुंभारवाडा, मंगलमूर्ती अपार्टमेंट येथे आलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गाडी थांबवण्यास सांगितली तेव्हा गाडी थांबवून मी, दुसरा पंच, पोलीस व आरोपी असे आम्ही आरोपीच्या मागे इमारतीमध्ये गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्याच्या घरात प्रवेश करुन बेडरुममध्ये लपवून ठेवलेले लाकडी बांबू व पिस्टल काढून दिले. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा दुपारी १२.५० वाजता सुरु करुन ०१.२० वाजता संपला. हे म्हणणे खरे नाही की, त्या पिस्टलवर 'मेड इन यु.एस्.ए., स्मित ॲन्ड वेस्टल कंपनी' असे लिहीलेले होते व ती ०.३२ बोअर काळ्या रंगाची, जुनी वापरती होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर पिस्टल माझ्या समक्ष जप्त केली, त्याला कागदी लेबल लावले व माझ्या सह्या घेतल्या.

०५. माझे शिक्षण पाचव्या वर्गापर्यंत झाले आहे. मला मराठी लिहीता वाचता येत नाही. माझ्या कोणत्या कागदावर सह्या घेत आहात, हे मी पोलीसांना विचारले नव्हते. को—या कागदावर माझ्या सह्या घेतल्याबाबत मी कुठेही तक्रार केली नव्हती. आरोपी सुद्धा उरण येथे राहतात. आरोपी महेश बालदी आमदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत माझी ओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** ) ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.
अलिबाग.
दिनांक : **०८/०२/२०२४**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **१७३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०६** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **समद शफी मुल्ला** |
| वय सुमारे | : | ५५ वर्षे, व्यवसाय : वाहनचालक |
| निवासस्थान | : | मु. उरण, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत** :

दि. ०५/०३/२०१० रोजी मला उरण पोलीस ठाण्यात बोलावले होते. कशासाठी बोलावले होते हे मला माहीत नाही. मी कागदावर सही केली. किती सह्या केल्या होत्या हे मला आठवत नाही. पंचनाम्यांवर माझ्या सह्या असून त्यातील मजकूर मला माहीत नाही. सह्या अनुक्रमे **निशाणी क्र. १७४ ते १७६ वर** आहेत.

**(साक्षीदार त्याच्या पूर्वीच्या बयाणावर कायम नसल्याने अभियोग पक्षाने त्याला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/०३/२०१० रोजी उरण पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक शेळकर यांनी मला ओमकार मेडीकल, नागाव रस्ता, उरण येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा पंचनामा करायचा होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ काशिनाथ घरत यांनी दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ एन्.आय्. हायस्कूलकडून एन्.एम्.एम्.टी. समोर होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाला

उत्तर–दक्षिण असा एन्.एम्.एम्.टी. बस स्टॉप ते एन्.आय्. हायस्कूलकडे जाणारा उरण–नागाव रस्ता असून पूर्वेस ओमकर मेडीकल व साने गुरुजी उद्यान आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा सकाळी ०७.३० वाजता सुरु होवून ०८.३० वाजता संपला.

०३. हे म्हणणे खरे नाही की, त्याच दिवशी मला उरण पोलीस ठाण्यात आरोपीचा निवेदन पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुनिल पेडणेकरने गुन्ह्यात वापलेले हत्यार कुठे लपवलेले आहे व ते मी काढून देतो असे माझ्यासमक्ष पोलीसांना सांगितले होते. ते हत्यार राहत्या घरात लपवून ठेवलेले आहे असे त्याने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, बांबूची काठी व रिव्हॉल्वर असे त्याने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दुपारी १२.३५ वाजता निवेदन पंचनामा सुरु होवून १२.४५ वाजता संपला.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी, आणखी एक पंच, आरोपी व पोलीस कर्मचारी असे आम्ही आरोपीने दाखविलेल्या जागेकडे खाजगी वाहनाने निघालो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही उरण, वाणी आळी मार्गे मुख्य रस्त्याने निघून आरोपीने कुंभारवाडा मंगलमूर्ती अपार्टमेंट येथे गाडी थांबविण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पुढे व आम्ही मागे अशा पद्धतीने आम्ही इमारतीत गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने चार फुट लांबीची बांबूची काठी व मेड इन यु.एस्.ए. स्मित अॅन्ड वेस्टल कंपनीची ०.३२ बोअर काळ्या रंगाची अंदाजे किंमत रुपये एक लाखाची पिस्टल बेडरुममधून माझ्या समक्ष काढून दिले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर मुद्देमाल जप्त करुन माझ्या समक्ष त्याला सिल लावले. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा १२.५० वाजता सुरु होवून

१.२० वाजता संपला. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा पोलीसांनी माझ्या समक्ष तयार केला, मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली.

०५.        माझे शिक्षण सातवीपर्यंत झालेले आहे. मला मराठी वाचता येते. मी साधारणत: को–या कागदांवर सह्या करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. आरोपी महेश बालदी उरणचे आमदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होवू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

उलटतपास नाकारला.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                                समक्ष

( **शै. वा. उगले** )                    ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.  मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.
अलिबाग.
दिनांक : **०४/०३/२०२४**.

**R.C.No. 82/2020**
Exh. **178/C**

**THROUGH VIDEO CONFERENCING**

Deposition of Witness No. **07** for the State

I do hereby on solemn affirmation state that :-

| | | |
|---|---|---|
| My Name | : | **Dr. Bijayan Krishna Acharya** |
| Age about | : | 64 Years, Occupation : Medical Officer |
| Residence | : | Deonar, Mumbai. |

**Examination-in-Chief by Spl. A.P.P. Smt. Naima Ghatte** :

I am qualified as M.S. in Neuro Surgery. In the year 2010, I was attached at MGM Hospital, Vashi as Neuro Surgeon. On 05/03/2010 patient Mayur Gharat came to the hospital along with his relatives. I examined the patient as well as resident doctor examined him. After examination, I found following injuries.

1. Swelling over occipital region. It was fresh and simple.
2. Knee swelling left side. Simple in nature.
3. CLW over right elbow. Simple in nature.

02. I gave him conservative treatment. He was discharged on 25/03/2010. I don't have copy of MLC with me. I have injury certificate. I mentioned those injuries in progress report of the patient. The contents of injury certificate are true and correct and bears my signature. It is at **Exh. 179.** The injuries are possible by a wooden stick article 'A'.

**Examination-in-Chief over**.

<u>Cross-Examination for accused by Adv. Shri. Ankit Bangera</u> :

03. I am consulting doctor for Neurology department. Since 05/03/2010 to 25/03/2010 I had given only medical treatment to the patient. Size of the injuries are not mentioned in the certificate. It is not true to say that the injuries were not visible.

04. Which relative brought the patient in hospital is not recorded. Identification mark of patient is also not mentioned in the certificate. During the course of treatment the investigation machinery did not show me wooden bamboo article 'A'. In certificate Exh. 179 it is not mentioned that injury was caused over occipital region. It is true to say that there were no bleeding injuries. It is true to say that there was no fracture to the patient. It is true to say that there was no injury to forearm.

05. MGM hospital is private hospital. It is not true to say that as per convenience of the patient I prepared certificate. History of assault is not recorded in certificate. The injuries are possible if a person falls down.

Cross-examination Over.

No Re-examination

Before me R. O. & A. C.

(**S.W. Ugale**)
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

(**S.W. Ugale**)
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

:: **CERTIFICATE** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

Alibag.
Dt. **14/03/2024.**

(**S.W. Ugale**)
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **१९०/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०८** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **राकेश पांडुरंग म्हात्रे** |
| वय सुमारे | : | ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | ओ.एन्.जी.सी., उरण, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत :**

सन २०१० मध्ये मी नोकरीस नव्हतो. दि. ०४/०३/२०१० रोजी घरी जात असताना रात्री ८.३० वाजताच्या सुमारास मी पाहिले की, गर्दी जमली होती व मारामारी चालू होती. फिर्यादी मयुर हा खाली बसलेला असल्याचे मी पाहिले. मी लांबून बघितले. त्यावेळी भरपूर गर्दी होती.

**(साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)**

**उलटतपास सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत :**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी उरण कोट पेन्शन पार्क येथून जात होतो. पोलीसांनी माझा जबाब घेतलेला नाही. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' हा मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का लिहीला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याने पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मी आरोपींना ओळखत नाही.

**उलटतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, मयुरला पडून लागले होते याची मला माहिती मिळाली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१०/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **८२/२०२०**
निशाणी क्र. **२०७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०९** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **जगदीश सिताराम शेळकर** |
| वय सुमारे | : | ५४ वर्षे, |
| व्यवसाय | : | नोकरी पोलीस निरीक्षक, काळा चौकी पोलीस ठाणे, मुंबई शहर |
| निवासस्थान | : | पनवेल, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद एस. पाटील यांचेमार्फत</u> :**

०१. दि. २०/०३/२००९ ते ३१/०५/२०१२ या कालावधीत मी उरण पोलीस ठाणे येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. दि. ०४/०३/२०१० रोजी रात्री ९:०० वाजता ते ०५/०३/२०१० रोजी सकाळी ९:०० वाजेपर्यंत मी पोलीस ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्यावर हजर होतो. त्यावेळी रात्री ९:४५ काशिनाथ परशुराम घरत हे पोलीस ठाण्यात आले होते. मी त्यांची फिर्याद घेतली. गुन्हा रजि. क्र. २४/२०१० भारतीय दंड विधान कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६(२) सह कलम ३४ प्रमाणे मी गुन्हा नोंदवून घेतला. रात्री २२:०० वाजता गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हा आरोपी सुनिल पेडणेकर वगैरे ०३ यांच्याविरुद्ध नोंदवण्यात आला होता.

०२. गुन्ह्यातील आरोपी पोलीस ठाण्यात आले होते. त्यांना मी सदर गुन्ह्यात अटक केली. रात्रीची वेळ असल्याने घटनास्थळाचा पंचनामा तेव्हा केला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ७:३० ते ८:३० वाजताच्या दरम्यान मी दोन

पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरुन काहीही वस्तू मिळून आल्या नाहीत. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यास **निशाणी क्र. २०८** देण्यात येते. सदर घटनास्थळ हे सार्वजनिक रस्त्यावर एन्.एम्.एम्.टी. बस स्टॉप ते एन्.आय्. हायस्कूलकडे जाणाऱ्या रस्त्यावर ओमकार मेडीकल स्टोअर्सच्या दुकानासमोर रस्त्यावर होते.

०३. पोलीस ठाण्यात चारही आरोपी कोठडीत होते. आरोपी क्र. १ सुनिल पेडणेकर याने निवेदन दिले ते मी दोन पंचासमक्ष नोंदवून घेतले. आरोपीने गुन्ह्यात वापरलेली काठी व लायसन्स रिव्हॉल्वर काढून देतो असे सांगितले होते. त्यानुसार आम्ही आरोपी व पंचासह खाजगी वाहनाने आरोपीच्या घरी गेलो. आरोपीचे घर मंगलमूर्ती अपार्टमेंट, कुंभारवाडा, उरण येथे गेलो. त्याच्या बेडरुममधून त्याने बांबूची काठी व रिव्हॉल्वर काढून दिले. बांबूची काठी व रिव्हॉल्वर निवेदनाप्रमाणे जप्त केली. आता मला दाखवण्यात आलेला निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपी क्र. १ ची सही आहे. त्यास **निशाणी क्र. २०९** देण्यात येते.

०४. फिर्यादीचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. फिर्यादीचा जखमी मुलगा एम्.जी.एम्. हॉस्पीटलमध्ये एक महिना ॲडमीट होता त्यामुळे गुन्ह्यात भारतीय दंड विधान कलम ३२५ वाढवून मिळण्याकरीता न्यायालयाला पत्र दिले होते. फिर्यादी व त्याच्या मुलाचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी क्र. १ कोर्टात हजर आहे. इतर

आरोपी गैरहजर आहेत. (आरोपींच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.)

०५. साक्षीदार क्र. ८ राकेश म्हात्रे याचा जबाब मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. साक्षीदाराच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला आहे. अधोरेखांकित भाग 'अ' बरोबर आहे त्यास **निशाणी क्र. २१०** देण्यात येते. मला रिव्हॉल्वर दाखवल्यास मी ओळखू शकेन. (सदरचे रिव्हॉल्वर हे आरोपी क्र. १ ला परत करण्यात आले असल्यामुळे त्याला विचारले असता त्याने सांगितले की, रिव्हॉल्वर सी.पी. ऑफीसला केसचा निकाल लागेपर्यंत जमा करण्यात आले आहे.) मला काठी दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवलेली आर्टीकल 'अ' काठी तिच आहे. माझ्या तपासात आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने मी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०६. सुनिल पेडणेकर यांनी गुन्हा क्र. २३/२०१० रात्री ०९:३० वाजता आरोपी मयुर काशिनाथ घरत, काशिनाथ घरत व नुतन काशिनाथ घरत यांच्याविरुद्ध दाखल केला होता. (साक्षीदारास गुन्हा क्र. २३/२०१० ची एफ्.आय्.आर. दाखवण्यात आली.) ती मीच नोंदवून घेतली होती. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **डी–१ निशाणी क्र. २१३** देण्यात येते.

०७. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा क्र. २३/२०१० दाखल झाल्यानंतर प्रस्तुतची फिर्याद दाखल झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा क्र. २३/२०१० चा तपास सहा. पोलीस निरीक्षक दौंडकर यांनी केलेला आहे. हे

म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये कुठेही रिव्हॉल्वरचा वापर केल्याबाबत लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर मला घटनेसंदर्भात खाणाखुणा मिळून आल्या नाहीत.

०८.	हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनामा करण्यासाठी कोणती खाजगी गाडी वापरली होती हे मी सांगू शकणार नाही. मी खाजगी गाडीच्या चालकाचा जबाब नोंदवलेला नाही. आरोपीच्या घरी कोण कोण माणसे होती याचा उल्लेख जप्ती पंचनाम्यामध्ये नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या घरी गेलो होतो ते आरोपीचेच होते हे दाखवण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल 'अ' कडील बांबूच्या काठीसारखी काठी कुठेही सहज उपलब्ध होवू शकते.

०९.	हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने निवेदन दिले होते त्याप्रमाणे मी काठी व रिव्हॉल्वर जप्त केले हे मी खोटे सांगत आहे. मी दोन्ही वैद्यकिय प्रमाणपत्रांचे अवलोकन केले होते. फिर्यादीच्या मुलाला फ्रॅक्चर झाले नव्हते. फिर्यादीच्या मुलाचे दोन वैद्यकिय प्रमाणपत्र उपलब्ध आहेत. हे मी सांगू शकत नाही की, दोन्ही वैद्यकिय प्रमाणपत्रातील जखमा वेगवेगळ्या आहेत. फिर्यादीच्या मुलाचा जबाब ३—४ महिन्यांनी घेतलेला आहे. तो जबाब द्यायला येत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या पत्नीचा जबाब ३ ते ४ महिन्यांनी घेतलेला आहे. फिर्यादीच्या मुलाने जबाब देताना कोर्टात अर्ज केल्याबाबत माहिती दिली नव्हती.

१०.	मला हे माहीत नाही की, आरोपी क्र. १ च्या मुलीची छेड काढल्याबाबत दि. १४/०२/२०१० रोजी एन्.सी. दाखल झाली होती.

११.	साक्षीदार क्र. २ मयुरचा जबाब मी नोंदवला होता. मयुरने जबाब देताना सांगितले नव्हते की, तो आईसाठी औषध आणण्यासाठी गेला होता. मयुरने

जबाब देताना सांगितले नव्हते की, आचल मुकादम तेथे आला होता. मयुरने जबाब देताना सांगितले नव्हते की, महेश बालदीने मागून धरुन ठेवले होते. मयुरने जबाब देताना सांगितले नव्हते की, त्याच्या अंगाच्या डाव्या बाजूला जखमा झाल्या होत्या. मयुरने जबाब देताना सांगितले नव्हते की, सुनिल पेडणेकरने रिव्हॉल्वर छातीला लावला होता. मयुर याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'ड' 'माझ्या तोंडावर माझे हात असल्याने मला नक्की कोणी मारले हे मी सांगू शकत नाही' हा त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे. सदर अधोरेखांकित भाग 'ड' यास **डी–२ निशाणी क्र. २१४** देण्यात येते.

१२. मयुर याच्या जबाबातील मजकूर की, 'माझा सुजित नावाचा कोणताही मित्र नाही' हा त्याच्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. सदर मजकूरास **डी–३ निशाणी क्र. २१५** देण्यात येते.

१३. मयुर याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'क' 'माझा जबाब हा माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे.' हा मजकूर मयुर याने सांगितला होता. सदर अधोरेखांकित भाग 'क' यास **डी–४ निशाणी क्र. २१६** देण्यात येते. सदरची काठी दोन फटक्यात मोडली म्हणून आरोपी क्र. १ ने रिव्हॉल्वर काढून छातीला लावला हे मयुर याने त्याच्या जबाबात सांगितले नव्हते. प्रविण, गणेश, आचल व माधव यांनी माझ्या डाव्या खांद्यावर, पाठीवर, पोटावर काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली तसेच आरोपी महेश बालदी याने आरोपी प्रविण याच्या हातातील काठी घेवून फिर्यादीच्या पाठीवर मारले असा मजकूर मयुर याने त्याच्या जबाबात सांगितला नव्हता.

१४. नुतन घरतच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' हा मी तिच्या

सांगण्याप्रमाणे नोंदवला आहे. सदर अधोरेखांकित भाग 'क' यास **डी–५ निशाणी क्र. २१७** देण्यात येते.

१५. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार क्र. ८ राकेश म्हात्रे यांनी सांगितलेला जबाब निशाणी क्र. २१० मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला नाही. एफ्.आय्.आर. क्र. २३/२०१० प्रमाणे मयुरला पडून मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व त्याच्या मुलाची खोटी फिर्याद व खोट्या जबाबावरुन मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीला व त्याच्या मुलाला शिवीगाळ व मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०८/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.